आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२ सप्टेंबर २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- यंदाचा जीडीपी वाढलेला दाखवण्यासाठी गेल्यावर्षीच्या पहिल्या तिमाहीचे आकडे कमी केल्याचा दावा केंद्र सरकारनं फेटाळला

- शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी निर्माण केलेली पक्षातली लोकशाही व्यवस्था उद्धव ठाकरे यांनी बदलून टाकल्याचा एकनाथ शिंदे यांच्या वकिलांचा सर्वोच्च न्यायालयात युक्तीवाद

- अयोध्येच्या राममंदिर न्यासाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची नियुक्ती

आणि

- नेपाळमध्ये महापुरात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या अकराशेच्या वर, सुमारे ५ हजार जण अजूनही बेपत्ता

**<><><><><>**

यंदाचा जीडीपी वाढलेला दाखवण्यासाठी गेल्यावर्षीच्या पहिल्या तिमाहीचे आकडे कमी केल्याचा दावा केंद्र सरकारनं फेटाळून लावला आहे. गेल्यावर्षी सुरुवातीला प्रसिद्ध केलेल्या आकड्यांसाठी २०११-१२ हे आधार वर्ष होतं. यंदा फेब्रुवारी सरकारनं २०२२-२३ हे आधार वर्ष स्वीकारल्यानं हे बदल झाल्याचं केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयानं म्हटलं आहे.

देशाचा आर्थिक वृद्धी दर मोजण्यासाठी वापरलेली पद्धत योग्य असल्याचा केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयानं म्हटलं आहे. गेल्यावर्षीच्या आर्थिक वृद्धी दरात सुधारणा करणे किंवा इतर गोष्टी सुधारित सांख्यिकी माहिती दर्शवतात, आर्थिक वृद्धी दर वाढवून दाखवण्यासाठी हे बदल केलेले नाही असं मंत्रालयानं प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

सध्याच्या सात ते आठ टक्के आर्थिक वृद्धीदरापेक्षा जास्त वाढीची क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेत आहे, असं प्रतिपादन जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांनी केलं आहे. अमेरिकन ॲशाविले इथं जी-२० देशांच्या अर्थमंत्री आणि मध्यवर्ती बँकांच्या गव्हर्नर्सच्या

परिषदेच्यावेळी ते बोलत होते. जागतिक स्तरावरचे उर्जा संकट, अनिश्चित व्यापार तसंच एल निनोचा परिणाम अशा अनेक गोष्टींमुळे भारताच्या आर्थिक कामगिरीवर परिणाम झाल्यांचं त्यांनी नमूद केलं. आताची वाढ ही भारताच्या क्षमतेची चुणूक आहे असंही त्यांनी सांगितलं.

<><><><>

JCRA या जपानच्या पतमानांकन संस्थेनं भारताचं सार्वभौम मानांकन BBB+ वरून सुधारुन A- श्रेणीत आणलं आहे. भारताची भक्कम आर्थिक वाढ, मजबूत खाजगी खरेदी आणि सार्वजनिक गुंतवणूक, तसंच वित्तीय प्रणालीच्या सुदृढतेत झालेल्या सुधारणांच्या पार्श्वभूमीवर हे मानांकन सुधारलं असल्याचं JCRA च्या अधिकृत निवेदनात म्हटलं आहे.

<><><><>

साहसी क्रीडांमधे उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्यांना दिले जाणारे तेनसिंग नोर्गे राष्ट्रीय साहस पुरस्कार २०२४ जाहीर झाले आहेत.  ८हजार मीटर उंचीची ५ शिखरं एकाच हंगामात सर करणारी बलजीत कौर, ऑक्सिजन सपोर्ट विना माऊंट एव्हरेस्ट सर करणारा पहिला भारतीय गिर्यारोहक स्काल्झांग रिग्झिन यांना अनुक्रमे जमिनीवरच्या आणि आकाशातल्या साहसाकरता हा पुरस्कार मिळणार आहे. दिव्यांग जलतरणपटू रिमो साहा याला पाण्यातल्या साहसाबद्दल तर इंडो तिबेटन पोलीस सेवेतून निवृत्त झालेले स्कीईंगपटू शिवप्रसाद चमोली यांना आयुष्यभराच्या कामगिरीसाठी या पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे. १५ लाख रुपये, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असं पुरस्काराचं स्वरूप असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते इतर क्रीडा पुरस्कारांबरोबरच हे प्रदान करण्यात येतील.

<><><><>

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी निर्माण केलेली पक्षातली लोकशाही व्यवस्था उद्धव ठाकरे यांनी बदलून टाकली असा युक्तीवाद एकनाथ शिंदे यांचे वकील नीरज कौल यांनी आज सर्वोच्च न्यायालयात केला. शिवसेना पक्षाचं नाव आणि पक्षचिन्ह यासंदर्भातल्या याचिकेवरच्या सुनावणी दरम्यान एकनाथ शिंदे यांच्या वकीलांच्या अंतिम युक्तीवादाला आज सुरुवात झाली. लोकशाही पद्धतीनं पक्ष चालवावा यासाठी निवडणूक आयोगानं इतर अनेक पक्षांप्रमाणे शिवसेनेलाही सूचना केल्या. त्या बाळासाहेबांनी मान्य केल्या पण २०१८ मध्ये अचानक पक्षाच्या घटनेत बदल झाले आणि पक्ष प्रमुखाच्या हातात मोठ्या प्रमाणात अधिकार

गेल्याचा दावा कौल यांनी केला. ही घटना पक्षानं निवडणूक आयोगाला सादर केली  नाही, असंही ते म्हणाले.

तत्कालीन शिवसेनेनं विरोधी विचारांच्या पक्षासोबत युती केल्यानं पक्षात अंसतोष वाढला आणि फूट पडली आणि आम्ही मूळ शिवसेना असल्याचा दावा केला असं कौल यांनी युक्तीवादादरम्यान सांगितलं. याप्रकरणी पुढील सुनावणी १५ सप्टेंबर २०२६ रोजी होणार आहे.

<><><><><>

राज्यातल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षणातून एकही पात्र मतदार वगळला जाणार नसल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी स्पष्ट केलं आहे. हरकती- सूचनांच्या सुनावणीसाठी संबंधितांना नोटीस बजावण्यासोबतच दूरध्वनीद्वारे संपर्क साधून सुनावणीला उपस्थित राहण्याचं आवाहन करावं. संबंधित व्यक्तीकडून प्रतिसाद मिळाला नाही, तर आदेशाची प्रत त्यांच्या व्हॉट्स्ॲप क्रमांकावर पाठवावी. संबंधित व्यक्तीला सुनावणीला उपस्थित राहण्यात अडचण असल्यास त्यांच्या नातेवाईकांना सुनावणीला उपस्थित राहून नागरिकत्वाचा पुरावा सादर करण्याची मुभा द्यावी, असे निर्देश चोक्कलिंगम यांनी दिले आहेत. नागरिकांना बदललेल्या मतदान केंद्राबाबत माहिती मिळावी, यासाठी सुनावणीची शिबिरं शक्यतो नवीन मतदान केंद्रांवर घ्यावीत. यामुळे नागरिकांना नवीन मतदान केंद्र शोधताना होणारा संभ्रम टाळता येईल. दुसऱ्या टप्प्यात केवळ नागरिकत्व आणि इतर कागदपत्रांची पडताळणी करावी. नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कागदपत्रांच्या यादीतील नागरिकांकडे उपलब्ध असलेले कागदपत्र स्वीकारावं, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

<><><><><>

भविष्यात लढण्यासाठी कॉंग्रेसला तळागाळात संपर्क साधून त्यांच्या समस्या सोडवणारी तरुणांची फळी अपेक्षीत असल्याचं लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिक इथं, काँग्रेस जिल्हाध्यक्षांच्या १० दिवसांच्या निवासी प्रशिक्षण शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होते. ही फळी मानसिक आणि शारिरीक दृष्ट्या तंदुरूस्त असली पाहिजे, असं ते म्हणाले. त्यादृष्टीनं त्यांनी आज जिल्हाध्यक्षांना जिजित्सू मार्शल आर्ट्सची माहिती प्रात्याक्षिकासह दिली.

केंद्र सरकारचं परराष्ट्र धोरण अयशस्वी ठरलं आहे, आपण अमेरीकेच्या दबावाखाली वागत असून, सरकारकडे कोणतीही स्पष्ट भूमिका नाही, अशी टीका त्यांनी केली. राहुल गांधी यांनी नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर इथल्या आंदोलनकर्त्या आदिवासी विद्यार्थ्यांशीही संवाद साधून, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या, आणि काँग्रेस पक्ष त्यांच्या या लढ्यात सोबत असल्याची ग्वाही दिली.

<><><><><>

अयोध्येच्या राममंदिर न्यासाच्या मुख्यकार्यकारी अधिकारी पदावर निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची नेमणूक झाली आहे. ऑपरेशन सिंदूरमधे पश्चिम हवाईदलाचं नेतृत्व मिश्रा यांनी केलं होतं. या कामगिरीसाठी त्यांना सर्वोत्तम युद्ध सेवा पदकही मिळालं आहे. ३९ वर्षांच्या सेवेनंतर ते गेल्या एप्रिलमधे सेवानिवृत्त झाले. या पदासाठी एकूण ५ हजार ५८५ अर्ज आले होते. विविध निकषांवर त्यातल्या १६ जणांच्या मुलाखती झाल्या होत्या.

<><><><><>

नेपाळमध्ये अकस्मात आलेल्या पुरानं आतापर्यंत १ हजार १२७ लोकांचा बळी घेतल्याचं निष्पन्न झालं असून अजूनही ४ हजार ९०० लोक बेपत्ता आहेत. पाऊस आणि राडारोडा यामुळे बचावकार्यात अडचणी येत आहेत. पुराचं संकट वातावरणातल्या बदलामुळे ओढावल्यानं हा मुद्दा आंतरराष्ट्रीय समुदायासमोर प्रामुख्यानं मांडायला हवा असं नेपाळचे प्रधानमंत्री बालेंद्र शहा यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

इजिप्तमध्ये आज झालेल्या बस अपघातात २२ जण मृत्युमुखी पडले तर २८ प्रवासी जबर जखमी झाले. प्रवाशांमध्ये जॉर्डनच्या नागरिकांचाही समावेश आहे. दक्षिण सिनाई प्रांतात हा अपघात घडला.

<><><><><>

अमेरिकेच्या कुवेतमधल्या लष्करी तळावर आणि जॉर्डनमधल्या दर्यावर्दी शिबिरावर हल्ला केल्याचा दावा इराणने केला आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्डने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलंय की इराकमधली अमेरिकेची बलूनमार्फत गस्तीची यंत्रणाही त्यांनी उद्ध्वस्त केली आहे.

//<><><><><>//